दै. तरुण भारत
११ फेब्रुवारी २०१८

# गुणवत्तापूर्ण शिक्षण तळागाळापर्यंत पोहोचण्याची गरज

## ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांचे प्रतिपादन : 'उच्च शिक्षणातील नवीन प्रवाह' विषयावर कार्यशाळा उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

जागतिकीकरणात शिक्षण महागले असून, नवीन शिक्षण व्यवस्थेत पूर्वप्राथमिक शिक्षणाचे महत्व वाढत आहे. ज्या देशाची शिक्षण आणि आरोग्य सुविधा उत्तम त्या देशाच्या उत्पन्नात भर पडते. म्हणूनच समाजातील विषमतेची दरी दूर करण्यासाठी बदलत्या काळानुसार गुणवत्तापूर्ण शिक्षण तळागाळातील मुलांपर्यंत सरकारने पोहचविले पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांनी केले.

कमला कॉलेजमध्ये 'उच्च शिक्षणातील नवीन प्रवाह' या विषयावरील आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ताराराणी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील होते. याप्रसंगी शोधनिबंध पत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले.



**कोल्हापूर : शोधनिबंध पत्रिकेचे प्रकाशन करताना डॉ. जे. एफ. पाटील. सोबत डावीकडून डॉ. तेजस्विनी मुडेकर, प्राचार्य डॉ. जे. बी. पाटील, डॉ. क्रांतिकुमार पाटील, डॉ. एस. एन. पवार, डॉ. अनिल पडोसी, डॉ. नेताजी पवार.**

डॉ. पाटील म्हणाले, 'केजी टू पीजी'पर्यंत शिक्षणात खासगीकरण आले आहे. खासगी विद्यापीठ कायद्यानुसार खासगी विद्यापीठ देशभरात शिरकाव करून शिक्षण महाग करीत आहेत. खासगी विद्यापीठाचे प्रवेश शुल्क पाहता सामान्यांच्या मुलांना तेथे प्रवेश घेणे अशक्य आहे. त्यामुळे कित्येक मुल शिक्षणापासून वंचित आहेत. सध्या शिक्षण संस्थांना आर्थिक निधी देण्याचे निकष सरकारने बदलले आहेत. ऑनलाईन परीक्षा हीच संकल्पना मुळात चुकीची असल्याचे त्यांनी सांगितले. सेमिस्टर परीक्षा पद्धतीमुळे प्राध्यापकांचा अध्यापनापेक्षा परीक्षांमध्ये जास्त वेळ जातो, अशी खंतही डॉ. पाटील यांनी व्यक्त केली. तसेच माहिती तंत्रज्ञानाचा योग्य वापर केला पाहिजे, असा सल्लाही त्यांनी दिला.

डॉ. क्रांतिकुमार पाटील म्हणाले, शिक्षकांची पात्रता युजीसी आणि शासनाने ठरवावी, मात्र शिक्षक निवडण्याचा अधिकार संबंधीत शिक्षण संस्थेला दिला पाहिजे. तरच शिक्षणाची गुणवत्ता वाढू शकते. एखाद्या विषयाचा अभ्यासक्रम बदलण्याचा अधिकारही शिक्षकांना दिला पाहिजे. नवीन शिक्षण पद्धतीचे स्वागत करीत असताना, विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास करणारे शिक्षण दिले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. सध्या तर खाजगी कंपन्यांना शाळा चालवण्यासाठी देण्याचा घाट सरकारने घातला आहे, ही संकल्पनाच समाजाला घातक आहे, अशी खंतही डॉ. पाटील यांनी व्यक्त केली.

दुसऱ्या सत्रात डॉ. अनिल पडोसी यांनी मार्गदर्शन केले. दिवसभर शोधनिबंधांचे वाचन करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी केले. आभार डॉ. नेताजी पवार यांनी मानले. यावेळी उपाध्यक्ष डॉ. एस. एन. पवार, प्राचार्य डॉ. जे. बी. पाटील, प्रा. अस्मिता पाटील, प्रा. रेखा पंडीत, प्रा. निता धुमाळ, प्रा. नेताजी पवार, प्रा. एन. एस. शिरोळकर, प्रा. अनघा पाठक, प्रा. वर्षा मैंदर्गीकर, डॉ. सुजय पाटील, प्रा. अनिल घस्ते आदी उपस्थित होते.